# संविधान (नव्याण्णावी सुधारणा) अधिनियम, २०१४

[३१ डिसेंबर, २०१४.]

भारताचे संविधान यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

तो, भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी,संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, संविधान (नव्याण्णावी सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, केंद्र सरकार, राजपत्रातील अधिसूचनेद्‌वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

अनुच्छेद १२४ची सुधारणा.

२. संविधानाच्या अनुच्छेद १२४ मधील खंड (२)मध्ये,-

(क) "सर्वोच्च न्यायालय आणि राज्यातील उच्च न्यायालये यांतील न्यायाधीशांपैकी, त्याला त्या प्रयोजनार्थ ज्यांच्याशी विचारविनिमय करणे आवश्यक वाटेल, अशा न्यायाधीशांशी विचारविनिमय केल्यानंतर," या मजकुराऐवजी, "अनुच्छेद १२४क मध्ये निर्दिष्ट केलेल्या राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाच्या शिफारशीवरून," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पहिले परंतुक वगळण्यात येईल;

(ग) दुसऱ्या परंतुकातील, "परंतु आणखी असे की,-" या मजकुराऐवजी "परंतु,-" हा शब्द दाखल करण्यात येईल.

नवीन अनुच्छेद १२४क, १२४ख व १२४ग चा समावेश करणे.

३. संविधानाच्या अनुच्छेद१२४ नंतर, पुढील अनुच्छेद समाविष्ट करण्यात येतील:-

"१२४क. (१) पुढील सदस्यांचा अंतर्भाव असणारा, राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग म्हणून संबोधण्यात यावयाचा एक आयोग असेल:-

(क) भारताचा मुख्य न्यायमूर्ती- पदसिद्ध अध्यक्ष;

(ख) भारताचा मुख्य न्यायमूर्ती यांच्या लगतनंतरचे सर्वोच्च न्यायालयाचे अन्य दोन वरिष्ठ न्यायाधीश- पदसिद्ध सदस्य;

(ग) विधि व न्याय याचा प्रभार असलेला केंद्रीय मंत्री- पदसिद्ध सदस्य;

(घ) प्रधानमंत्री,भारताचा मुख्य न्यायमूर्ती व लोकसभेचा विरोधी पक्षनेता किंवा जेव्हा तेथे असा विरोधी पक्षनेता नसेल तेव्हा, लोकसभेतील एका सर्वात मोठ्या विरोधी पक्षाचा नेता, यांचा अंतर्भाव असणाऱ्या समितीने नामनिर्देशित करावयाच्या दोन विख्यात व्यक्ती- सदस्य:

परंतु, विख्यात व्यक्तींपैकी एक व्यक्ती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक किंवा महिला यांमधील व्यक्तींमधून नामनिर्देशित करण्यात येईल:

परंतु आणखी असे की, विख्यात व्यक्ती, तीन वर्षांच्या कालावधीसाठी नामनिर्देशित करण्यात येईल आणि पुन:नामनिर्देशनासाठी पात्र असणार नाही.

(२) राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, आयोगाचे कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्याच्या रचनेत दोष आहे केवळ या कारणावरून प्रश्नास्पद ठरविता येणार नाही किंवा विधीअग्राह्य ठरविण्यात येणार

नाही.

आयोगाची कामे.

१२४ख. राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाची कर्तव्ये, –

(क) भारताचा मुख्य न्यायमूर्ती, सर्वोच्च न्यायालयाचे अन्य न्यायाधीश, उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती व उच्च न्यायालयांचे अन्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यासाठी व्यक्तींची शिफारस करणे;

(ख) उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींची व अन्य न्यायाधीशांची एका उच्च न्यायालयातून अन्य कोणत्याही उच्च न्यायालयात बदली करण्याची शिफारस करणे; आणि

(ग) शिफारस केलेली व्यक्ती, सक्षम व सचोटीची असल्याची सुनिश्चिती करणे,

ही असतील.

कायदा करण्याचा संसदेचा अधिकार.

१२४ग. संसदेस, कायद्याद्वारे, भारताचा मुख्य न्यायमूर्ती व सर्वोच्च न्यायालयाचे अन्य न्यायाधीश आणि उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायमूर्ती व अन्य न्यायाधीश यांची नियुक्ती करण्याची कार्यपद्धती विनियमित करता येईल आणि आपली कामे पार पाडण्याची कार्यपद्धती, नियुक्तीसाठी व्यक्तींची निवड करण्याची रीत आणि त्यास आवश्यक वाटतील अशा अन्य बाबी, विनियमांद्वारे निर्धारित करण्यासाठी आयोगास अधिकार प्रदान करता येईल.".

अनुच्छेद १२७ ची सुधारणा.

४. संविधानाच्या अनुच्छेद १२७ मधील खंड (१)मध्ये, "राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने आणि संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीचा विचार घेतल्यानंतर,

भारताचा मुख्य न्यायमूर्ती हा," या मजकुराऐवजी, "राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग,भारताच्या मुख्य न्यायमूर्तीने त्याच्याकडे केलेल्या निर्देशावरून, राष्ट्रपतीच्या पूर्वसंमतीने आणि संबंधित उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय केल्यानंतर," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अनुच्छेद १२८ ची सुधारणा.

५. संविधानाच्या अनुच्छेद १२८मध्ये, "भारताचा मुख्य न्यायमूर्ती," या मजकुराऐवजी, "राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अनुच्छेद २१७ ची सुधारणा.

६. संविधानाच्या अनुच्छेद २१७ मधील खंड (१)मध्ये, "भारताचा मुख्य न्यायमूर्ती, राज्याचा राज्यपाल, आणि तसेच मुख्य न्यायमूर्तीहून अन्य न्यायाधीशाची नियुक्ती करावयाची असल्यास उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती याचा विचार घेतल्यानंतर," या मजकुराऐवजी, "अनुच्छेद १२४क मध्ये निर्दिष्ट केलेल्या राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाच्या शिफारशीवरून," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अनुच्छेद २२२ ची सुधारणा.

७. संविधानाच्या अनुच्छेद २२२ मधील खंड (१)मध्ये, "भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय केल्यानंतर," या मजकुराऐवजी, "अनुच्छेद १२४क मध्ये निर्दिष्ट केलेल्या राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाच्या शिफारशीवरून," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अनुच्छेद २२४ ची सुधारणा.

८. संविधानाच्या अनुच्छेद २२४ मधील,-

(क) खंड (१)मध्ये," राष्ट्रपती" या मजकुराऐवजी, " राष्ट्रपती, राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाशी विचारविनिमय करून," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) खंड (२)मध्ये," राष्ट्रपती" या मजकुराऐवजी, " राष्ट्रपती, राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोगाशी विचारविनिमय करून," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

अनुच्छेद २२४क ची सुधारणा.

९. संविधानाच्या अनुच्छेद २२४क मध्ये, "कोणत्याही राज्याच्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती, कोणत्याही वेळी राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने," या मजकुराऐवजी, "राष्ट्रीय न्यायिक नियुक्ती आयोग,कोणत्याही राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने त्याच्याकडे केलेल्या निर्देशावरून, राष्ट्रपतींच्या पूर्वसंमतीने," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अनुच्छेद २३१ ची सुधारणा.

१०. संविधानाच्या अनुच्छेद २३१ मधील, खंड (२)मधील उपखंड (क) वगळण्यात येईल.

डॉ.संजय सिंह,

सचिव, भारत सरकार.